**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात, समान नागरी कायद्यावर देशभरात व्यापक चर्चेची गरज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून व्यक्त

- राज्याचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

- 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या ८० लाखांहून अधिक लाभार्थ्यांच्या खात्यात पहिल्या दोन हप्त्यांचे पैसे जमा

**आणि**

- बारामती विधानसभा मतदारसंघातून स्वतः निवडणूक न लढवण्याचे अजित पवार यांचे संकेत

**<><><><><>**

देशातले १४० कोटी नागरिक एकजुटीने वागले तर, प्रत्येक आव्हानावर मात करत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्राचं स्वप्न साकार होऊ शकेल असं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त सलग ११व्यांदा मोदी यांनी लाल किल्ल्यावर तिरंगा फडकावला, त्यानंतर ते देशाला संबोधित करत होते. विकसित भारतात सर्वसामान्यांच्या जगण्यात सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असावा, आणि लोकांना गरज असेल तेव्हाच
सरकारने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. ऐकूया एक वृत्तांत

**होल्ड - कॅप्सूल**

*प्रत्येक धर्माचे वेगवेगळे वैयक्तिक कायदे असल्यावर समाजात फूट पडते, म्हणून धर्मनिरपेक्ष नागरी कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधली दरी कमी होईल असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.*

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१५ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**होल्ड - प्रधानमंत्री**

*देशात वारंवार निवडणुका होत राहिल्या तर, प्रत्येक विकासकामाकडे निवडणुकांच्या अनुषंगानेच पाहिलं जातं, म्हणून एक देश, एक निवडणूक संकल्पना राबवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा असं ते म्हणाले.*

*आपण कोणत्याही राजकीय भावनेतून नाही तर राष्ट्र प्रथम या भावनेतूनच देशात सुधारणा घडवून आणल्या. आजवरच्या प्रयत्नांमुळे देशाचं दरडोई उत्पन्न दुप्पट करण्यात सरकारला यश आल्याचंही ते यावेळी म्हणाले.*

*देशातल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशात जावं लागू नये यासाठी येत्या पाच वर्षांत वैद्यकीय प्रवेशाच्या ७५ हजार नव्या जागा तयार करण्याची घोषणाही त्यांनी केली.*

*अधिकाधिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी राज्यांनी निकोप स्पर्धा करावी असं आवाहन त्यांनी केलं. यावेळी त्यांनी बांग्लादेशातल्या परिस्थितीविषयी आणि तिथल्या हिंदू आणि अल्पसंख्यकांविषयी चिंता व्यक्त केली.*

**होल्ड - बांग्लादेश बाइट**

*या कार्यक्रमाला देशाच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. भाषणानंतर त्यांनी उपस्थितांनी भेट घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सकाळी नवी दिल्लीतल्या अमरज्योती शहीद स्मारकावर आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही देशवासियांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.*

**<><><><><>**

राज्यातही सर्वत्र स्वातंत्र्यदिन उत्साहाने साजरा आला. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी पुण्यातल्या राजभवनात राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते.

मुंबईत मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. राज्य शासन राज्याचा सर्वांगीण विकास आणि नागरिकांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे. असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं...

**होल्ड -- बाईट -- मुख्यमंत्री**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळायला सुरुवात झाली असून युवकांना रोजगारासाठी प्रशिक्षण, विद्यावेतन, गोरगरीब, दुर्बलांना वर्षातून तीन मोफत गॅस सिलेंडर, शेतकऱ्यांना वीज सवलत, मुलीना संपूर्ण व्यवसायिक शिक्षण मोफत अशा अनेक योजना सुरु केल्याचंही त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते **नागपूर** मध्ये ध्वजारोहण झालं. केंद्रीय सामाजिक न्याय आणि सबलीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुंबईत वांद्रे इथल्या उपनगरीय जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय ध्वज फडकावला. विधान भवन, मुंबई येथे आज देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विधानसभेचे अध्यक्ष, ॲड.राहुल नार्वेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे उपस्थित होत्या.

श्रोते हो, राज्यात विविध ठिकाणी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमाचा वृत्तांत तुम्ही सव्वा सात वाजता आकाशवाणीवरुन ऐकू शकता.

**<><><><><>**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या पहिल्या हप्त्याची रक्कम जमा होण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आतापर्यंत ८० लाखांपेक्षा अधिक पात्र महिलांना या योजनेचा लाभ लाभ देण्यात आला आहे, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी आज दिली. कालपर्यंत १ कोटी ६२ लाखापेक्षा अधिक महिलांनी नोंदणी केली आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. आतापर्यंत लाभार्थींच्या बँक खात्यात २ महिन्यांच्या लाभाची रक्कम एकूण ३ हजार रुपये जमा करण्यात आली.

मुख्यमंत्र्यांनी आज या योजनेच्या लाभार्थी महिलांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला.

**<><><><><>**

बारामतीतून विधानसभा निवडणूक आपण सात-आठ वेळा लढली असून आता मला ती लढवण्यात स्वारस्य नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार आज म्हणाले. आपला मुलगा जय पवार याला उमेदवारी द्यावी, अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. त्यामुळे जय याच्या उमेदवारीविषयी पक्षाचं संसदीय मंडळ निर्णय घेईल, असं पुण्यात वार्ताहरांशी बोलताना त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

वाशिम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले. मृतांमधे सात वर्षांच्या मुलाचा समावेश आहे. अपघातग्रस्त गाडी नागपूरहून मुंबईला जात असताना वाशिम जिल्ह्यात हा अपघात झाला. जखमींना अमरावती इथं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><>**

महिलांच्या आरोग्य प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय परिषदा गाजविणारे, संवेदनशील, विज्ञानवादी लेखक आणि वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. शंतनू अभ्यंकर यांचं आज पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात निधन झाले. फुफ्फुसाच्या कर्करोगासाठी गेले काही महिने त्यांच्यावर उपचार सुरू होते. वाई इथं त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त भंडारा जिल्ह्यात उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा पालकमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते आज सत्कार करण्यात आला. पोलीस कवायत मैदानावर आयोजित स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर सत्कार सोहळा पार पडला.

**<><><><>**

कोराडी इथल्या क्रीडांगणातून राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू घडतील असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ते आज नागपुरजवळच्या

कोराडी तालुका क्रीडा संकुल सुविधांचं लोकार्पण आणि हर घर तिरंगा अंतर्गत आयोजित भव्य तिरंगा रॅलीच्या सोहळ्यात  बोलत होते. कोराडीच्या या तालुका क्रीडा संकुलाचं वीरांगना राणी अवंतीबाई असं नामकरण या समारंभात करण्यात आलं. या क्रीडासंकुलात बॉक्सींग, टेबल टेनीस, फेन्सींग, कुस्ती, जिम्नॉस्टिक, बॅलन्सींग बिम, ट्रायो अॅक्रोबॅटीक्स, रोमन रिंग, योगा आदी विविध प्रकारच्या खेळाच्या सुविधा उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

गडचिरोलीत इतर मागासवर्गीय मुली आणि मुलांच्या स्वतंत्र शासकीय वसतिगृहाचं उद्घाटन आज झालं. अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांनी प्रत्येकी १०० जागांची प्रवेश क्षमता असलेल्या या वसतीगृहांचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या कालावधीत मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होईल, असा अंदाज आहे.

**//<><><><><>//**